स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

मानव्य विध्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी.पदवीकारिता
सादर करावयाचा शोध प्रबंधाचा संकल्पित

संशोधन आराखडा

संशोधन विषय

“भारतीय संविधानातील मूल्य साक्षरता:एक चिकित्सक अभ्यास; विशेष संदर्भ परभणी जिल्हा.”

संशोधक

नितीन लक्ष्मनराव शिंदे

एम.ए.,बी.एड.,सेट,राज्यशास्त्र

मार्गदर्शक

प्रा.डॉ.एस.एस. भालेराव

सहायक प्राध्यापक व विभाग प्रमुख,

राज्यशास्त्र विभाग

बी.रघुनाथ महाविद्यालय,परभणी.

२०२१

**“भारतीय संविधानातील मूल्य साक्षरता:एक चिकित्सक अभ्यास;
विशेष संदर्भ परभणी जिल्हा.”**

प्रस्तावना

प्राचीन काळापासून मानवी इतिहास संघर्षाचा असल्याचे दिसून येते. परंतु काळानुरूप संघर्षाचे स्वरूपही बदलत गेले. संघर्ष हा सत्ता किंवा वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवर मोठी युद्धे झाली. परंतु शस्त्रांच्या वा दंड शक्तीच्या आधारे सत्ता जास्त काळ टिकणे अशक्य असल्याची प्रचिती आल्यामुळे सत्तेला लोकांची मान्यता विशिष्ट तत्त्वांच्या आधारे मिळवणे आवश्यक झाले असल्या कारणाने आणि सत्तेला वैधानिक (जनतेची अधिमान्यता) मान्यता मिळावी याकरिता अनेक संकल्पनांचा उदय झाला. त्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आदि मूल्ये सत्तेच्या प्रस्तावनेत केंद्रस्थानी असल्यामुळे जनतेला महत्त्व प्राप्त झाले.

जागतिक पातळीवर मानवी मूल्यांच्या समर्थनार्थ अनेक विचारवंतांकडून लिखाणही झाले आहे. आणि त्यातूनच संवैधानिक मुल्ये लोकशाहीच्या व व्यक्तीच्या प्रतिष्ठेच्या अनुषंगाने विकसित होत गेली. संवैधानिक मूल्यांच्या पायाभरणीत इंग्लंडची क्रांती, फ्रेंच क्रांती, अमेरिकन राज्यक्रांती यांचा समावेश करता येऊ शकतो. या क्रांतीच्या मुळाशी असलेल्या तत्त्वज्ञानातून लोकशाही शासन व्यवस्थेचा विकास झालेला आपणास दिसून येतो . भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. भारतीय राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या सारखी मुले लोकशाहीचा प्राण समजली जातात. स्वातंत्र्य, समता, न्याय ही मूल्ये प्रामुख्याने अमेरिकन, फ्रेंच राज्यक्रांती पासून जगामध्ये प्रसारित झालेले दिसून येतात. 4 जुलै 1976 रोजी अमेरिकन राज्य क्रांती घडून आली. तेव्हा पासूनच जगामध्ये स्वातंत्र्य या संकल्पनेचा प्रसार झाल्याचे दिसते. अमेरिकन क्रांती नंतर 14 जुलै 1989 मध्ये राज्य क्रांती घडून आली व स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना महत्त्व प्राप्त झाले.

लोकशाही शासन व्यवस्थेच्या संचलनासाठी राज्यघटना आवश्यक असते. भारतीय राज्य घटनेच्या निर्मात्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीची देणगी असलेली स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेची प्रधान मुल्ये म्हणून स्वीकारली . तसेच अमेरिकन घटनेतून मूलभूत अधिकारांची संकल्पना, आयर्लंडच्या संविधानातून मार्गदर्शक तत्वे आणि इंग्लंडच्या राज्य घटनेतून संसदीय लोकशाही संबंधी महत्त्वपूर्ण तरतुदींचा सार भारतीय संविधानकारांनी राज्यघटनेमध्ये समाविष्ट केलेला आहे.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वातंत्र्य झाला. परंतु कॅबिनेट मिशन योजने अन्वये प्रत्यक्षात संविधान निर्मितीच्या कार्यास 9 डिसेंबर 1946 पासून सुरुवात झाली होती. 26 नोव्हेंबर 1949 रोजी घटना समितीने राज्यघटनेच्या मसुदयाला संमती दिली. मात्र प्रत्यक्षात राज्यघटना 26 जानेवारी 1950 पासून अमलात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते," दैववादाचा मुर्तीमंत आविष्कार म्हणजे भारतीय संविधान होय. लोकशाही, स्वातंत्र्य,समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांच्या आधारावर त्याची उभारणी झालेली असून रक्ताचा एकही थेंब न सांडवा लागता या देशात आमूलाग्र सामाजिक बदल घडवून आणणारी राज्यप्रणाली आपण सुरू करीत आहोत. डॉ. आंबेडकरांनी असा इशारा दिला होता की, आपण राजकीय लोकशाहीचा प्रयोग सुरू केला आहे. पण आपले सामाजिक, आर्थिक जीवन मात्र विषमता पूर्ण आहे. अशा रीतीने आपण अनेक अंतर्विरोधाच्या धुमश्चचक्रीत पदार्पण करीत आहोत. आणि हे अंतर्विरोध आपण मिटविले नाही तर आपला राजकीय लोकशाहीचा डोलारा कोसळून पडेल. आणि स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय यासारखी ही मुल्ये -हास पावतील. यातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या संवैधानीक मूल्यांचे स्थान अधोरेखित करून समाजात मूल्यांबाबत उदासीनता असेल तर भारतीय लोकशाहीला निर्माण होणारा धोका स्पष्ट केला आहे.

भारतीय राज्यघटनेची सुरुवात प्रास्ताविकेपासून करण्यात आलेली आहे. ती प्रास्ताविका पुढीलप्रमाणे आहे. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून आमच्या संविधान सभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वाताप्रत अर्पण करत आहोत.

आम्ही भारताचे लोक अशी प्रास्ताविकेची सुरुवात खूप अर्थपूर्ण आहे. राज्यव्यवस्थेची सार्वभौम सत्ता ही अंतिमतः लोकांच्या हाती आहे, हे संविधान स्वतःहून लोकांनी लोकांना अर्पित केलेले आहे, ते कोणीही त्यांच्यावर लादलेले नाही, हे यातून सूचित होते. यामुळे संवैधानिक मूल्यांच्याप्रती जनतेने जागरूक असणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेच्या निर्मात्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय यासारख्या मूल्यांचा समावेश भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत केल्याचे दिसून येते. प्रस्ताविका ही भारतीय राज्यघटनेचे सार आहे. यामध्ये व्यक्तीला विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता आणि सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय याची हमी देण्यात आलेली आहे.

भारतीय राज्य घटनेतील अंगीकृत मुले प्रत्यक्षात अमलात यावीत यासाठी संविधान निर्मात्यांनी त्यांचा समावेश प्रस्तावनेत केलेला आहे.तद्वतच मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वांच्या रूपातही त्यांचा विस्ताराने उल्लेख केलेला आहे. राज्यघटनेतील या मूल्यांच्या समावेशाने जनतेला मत स्वातंत्र्य,अभिव्यक्ती स्वातंत्र्य, सभा संघटना स्वातंत्र्य, धर्माच्या प्रचार व प्रसाराचे स्वातंत्र्य इत्यादी स्वातंत्र्ये प्राप्त झाली आहेत. तसेच शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात आरक्षणाच्या तरतुदीने शोषित, वंचित व मागासलेल्या घटकांना मुख्य सामाजिक प्रवाहात आणण्यास मदत झाली आहे. महिलांच्या आरक्षण हक्कामुळे स्त्री पुरुष समानता या मुल्याच्या प्रस्थापनेस व्यावहारिकता प्राप्त झाली. या संवैधानिक मूल्यांच्या अंमलबजावणीमुळे कायद्यापुढे समानता व स्त्री पुरुष समानता प्रस्थापित झाली. तसेच अस्पृश्यतेचे सारख्या अनिष्ट प्रतीचे भारतीय समाजातून उच्चाटन झाल्याचे दिसून येते. व भारतीय समाजातील दलित, वंचित, शोषित, आदिवासी, शेतकरी, अल्पसंख्यांक, स्त्रिया, श्रमिक इत्यादी घटकांना सामाजिक न्याय प्राप्त झाल्याचे सिद्ध होते.

भारतीय राज्यघटनेतील मूल्यांच्या आधारे स्पष्ट होते की, घटनात्मक मूल्ये व त्यांची अंमलबजावणी ही जनतेच्या कल्याणासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु कोणत्याही व्यवस्थेचे यश शासक आणि शासित सहकार्य आणि मूल्यांबद्दल जागरूकता यावर अवलंबून असते. यासाठी सामान्य जनतेलाही राज्यघटनेतील मूल्ये व त्यांच्या समावेशाचा उद्देश माहिती असणे गरजेचे आहे. याशिवाय सामान्य जनता आणि लोकशाही दोन्हींचाही विकास होणे अशक्य आहे. यामुळे भारतातीय संविधानातील मुल्य साक्षरता : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ परभणी जिल्हा) याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन कार्यात करण्यात येणार आहे.

अभ्यास विषयाचे महत्व

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि 26 जानेवारी 1950 रोजी स्वतंत्र भारतासाठी संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. स्वातंत्र्यापासून आजतागायत स्वातंत्र्योत्तर काळात आपण जी व्यवस्था स्वीकारली ती उत्तरोत्तर विकसित झालेली आपणास दिसून येते. असे असले तरीही भारतीय संविधान आणि संवैधानीक मुल्ये सर्वसामान्य जनतेमध्ये पूर्णतः रूजलेतच असे नाही. भारतामध्ये विविध जाती ,धर्म, पंथ, संप्रदाय आणि भाषा असणारे लोक वास्तव्यास आहेत .या आधारावर येथे प्रत्येकाची एक वेगळी ओळख आहे. कारण येथे प्रत्येक माणूस वेगवेगळ्या पातळीवर अनेक चेहऱ्यांनी वावरताना दिसतो. जात म्हणून लोकशाही विरोधी मूल्यांचा आग्रह धरला जातो. त्यामुळे अपेक्षित मूल्य व त्या अनुषंगाने लोकशाही मूल्यांच्या दृष्टीने राजकीय सामाजीकरण होऊ शकले नाही.

त्यातून संवैधानीक मुल्यांचे अवमुल्यन, भ्रष्टाचार, लोकप्रतिनिधींचे बेजबाबदार वर्तन, आर्थिक विषमता, व सामान्य जनतेचे राजकीय सामाजिक व आर्थिक मागासलेपण,व आपल्या

हक्कांच्या बाबतीत उदासीनता यासारखे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. यासारख्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी व लोकशाही यशस्वीतेच्या दृष्टीने भारतीय राज्यघटनेतील मूल्यांचा पद्धतशीर प्रसार व प्रचार म्हणजेच मूल्य साक्षरता हा महत्त्वाचा घटक आहे. परंतू मुल्ये साक्षरतेसाठी कोणतीही व्यवस्था, प्रशिक्षण किंवा सामाजिक परिस्थितीशी अनुकूल असणारी यंत्रणा म्हणावी त्याप्रमाणात नसल्यामुळे भारतीय घटनेतील मुले व त्यासंबंधी जागरूकतेचा अभाव दिसून येतो. त्यातूनच एकंदरीत व्यवस्थेविषयी निर्माण झालेली उदासीनता हा लोकशाही व्यवस्थे समोरील प्रमुख अडथळा आहे. त्यामुळे भारतीय संविधानातील मूल्ये आणि संविधान साक्षरतेची आज मोठ्या प्रमाणावर गरज असल्याचे दिसते. त्यामुळे प्रसंगी अभ्यास विषयाचे महत्त्व दिसून येते.

संशोधन समस्या

भारतीय समाज एकसंध होऊन विकासाकडे वाटचाल व्हावी या उद्देशाने घटनाकारांनी लोकशाही, स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या मूल्यांची तरतूद केलेली आहे. जनतेला आचार-विचार, मत, अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाल्या मुळे भारतीय लोकशाही अधिक मजबूत होईल. समतेच्या तत्त्वामुळे विषमतेचे उच्चाटन होऊन समताधिष्ठित समाज निर्माण होईल. दारिद्र्य, बेरोजगारी, भ्रष्टाचार, शोषण यासारखे प्रश्न दूर होतील .सर्व लोकांना सामाजिक न्यायाची प्राप्ती झाल्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही. प्रत्येक जण विकासाकडे वाटचाल करील असा उदात्त ध्येयवाद उराशी बाळगून घटनाकारांनी लोकशाही मूल्यांच्या प्रेरणेतून संविधान निर्मिती केली.

राज्यघटनेतील मूल्यांबद्दलची निरक्षरता, राज्यकर्त्या वर्गाकडून होणारे शोषण, सामाजिक विषमता, भ्रष्टाचार व बेरोजगारी यासारखे प्रश्न भारतीय लोकशाही समोरील सर्वात मोठी आव्हाने ठरली आहेत. लोकशाही व्यवस्था व्यवहारात फक्त एक फार्स म्हणूनच की काय अमलात आहे हे वास्तव दृष्टीआड करता येण्यासारखे नसल्याच्या पार्श्वभूमीवर लोकशाहीच्या यशस्वीतेतील संविधनातील मुल्य साक्षरता हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संविधान साक्षरते अभावी लोकशाही व्यवस्थेसंबंधी येणारी उदासीनता व नैराश्य हे संधीसाधू व स्वार्थी राजकीय नेतृत्वाला आपल्या स्वार्थासाठी सत्तेचा वापर करण्यास पोषकता प्राप्त करत असल्यामुळे लोकशाहीचा गाभा पोकळ झाला आहे. या पार्श्वभूमीवर काही प्रश्न संशोधकाला पडले आहेत. त्यात प्रामुख्याने सामाजिक कल्याणाकरिता जनतेच्या हितासाठी कायदे करण्यासाठी संसदेला प्रेरित करणाऱ्या संविधानिक मूल्यांबद्दल जनसामान्यांना माहिती आहे काय ? त्या मूल्यांचा त्यांच्या जीवनावर कोणता परिणाम होतो याची त्यांना जाणीव आहे काय ? परभणी जिल्ह्यातील लोकांच्या मागासलेपणात संविधान साक्षरतेचा अभाव कारणीभूत आहे काय ?

व्यक्तीच्या विकासासाठी संविधानिक मूल्य साक्षरतेची गरज आहे काय ? या समस्यांच्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न असेल.

संशोधनाची उद्‌दिष्टे

प्रस्तुत विषयात भारतीय राज्यघटनेतील मूल्ये आणि संविधान साक्षरतेचा अभ्यास करत असताना संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेली उद्‌दिष्टे पुढीलप्रमाणे मांडलेली आहेत.

1) भारतीय संवैधानिक मूल्यांचा अभ्यास करणे.
2) भारतातील संविधानिक मूल्य आणि संविधान साक्षरतेच्या मार्गांचा शोध घेणे.
3) परभणी जिल्ह्यातील जनतेत असलेली संविधान साक्षरता आणि संविधानातील मूल्यांची जागरूकता यांचा आढावा घेणे.
4) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी संविधान साक्षरतेचा शोध घेणे.
5) संविधान साक्षरता आणि विकास प्रक्रिया यांचा सहसंबंध.
6) परभणी जिल्ह्याच्या विकासात संविधानिक मूल्य साक्षरतेच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
7) संविधानिक मूल्य साक्षरते मुळे नागरिक अशा व्यक्तिमत्व विकास व विचार प्रक्रियेत होणाऱ्या बदलाचा शोध घेणे.

परिकल्पना

परभणी जिल्ह्यातील नागरिकांच्या सामाजिक,राजकीय आणि आर्थिक मागासलेपणात संवैधानिक मूल्यांची अज्ञान व संविधान साक्षरतेच्या अभाव कारणीभूत असल्याचे दिसून येते.

गृहीतकृत्ये

अभ्यास विषयाला अनुसरून प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेली गृहीतके खालील प्रमाणे आहेत.

1) संविधान साक्षरता राजकीय व्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे.
2) परभणी जिल्ह्यातील नागरिकांमध्ये संवैधानिक साक्षरतेचा अभाव आहे.
3) परभणी जिल्ह्यातील नागरिकांमध्ये संवैधानिक मूल्य साक्षरतेच्या अभावी राजकीय उदासीनतेचे प्रमाण जास्त आहे.

4) परभणी जिल्ह्यामध्ये संवैधानिक मुल्य साक्षरतेच्या व्यवस्थेचा अभाव आहे.
5) संविधान साक्षरतेच्या अंमलबजावणीत उणीवा असल्याने अनेक समस्या निर्माण होतात.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे सामाजिक शास्त्राची निगडित असल्याने यात ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. भारतीय राज्यघटनेतील मूल्ये समजून घेण्यासाठी संविधान सभेतील चर्चा व घटना तज्ञांची मते यासाठी ऐतिहासिक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. तर व्यावहारिक पातळीवर या मूल्यांची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली आहे व किती लोकांमध्ये या मूल्यांच्या बाबतीत जागरूकता आहे हे पाहण्यासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलन साधनांचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये प्राथमिक स्त्रोतात मुलाखती व प्रश्नावलीच्या आधारे तथ्य संकलित करण्यात येणार आहेत. तसेच द्वितीय स्त्रोतात विविध तज्ञ लेखकांचे संदर्भ ग्रंथ, राज्यघटना व त्यावर आधारित प्रकाशित ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, विविध शासकीय अहवाल, संकेतस्थळे इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा

प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेला भारतातीय संविधानातील मुल्य साक्षरता : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ परभणी जिल्हा) हा विषय व्यापक आहे. नागरिकांच्या न्याय्य हक्कासाठी व त्यांच्या दर्जामध्ये सुधारणा व्हावी, त्यांचे शोषण थांबावे, अत्याचारांना प्रतिबंध व्हावा या हेतूने तसेच ते आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या सक्षम व्हावेत म्हणून संविधान साक्षरतेची गरज आहे.

परंतु संपूर्ण देशाच्या कार्यक्षेत्राचा उहापोह या ठिकाणी करणे शक्य नाही. त्यामुळे प्रातिनिधिक स्वरूपात परभणी जिल्ह्याच्या संदर्भाने हा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संविधानिक मूल्य आणि संविधान साक्षरता या संदर्भातील वास्तव परिस्थितीचे अवलोकन करण्यासाठी नागरिकांची नमुना निवड करण्यात येणार आहे. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी परभणी जिल्हा ही क्षेत्रीय मर्यादा निश्चित केलेली आहे.

प्रकरणांची रूपरेषा

1) **प्रकरण पहिले – प्रस्तावना**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाचे स्वरूप समस्या सूत्रंण, विषयाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतकृत्ये, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा संशोधन पद्धती तथ्य संकलनाचे स्त्रोत प्रकरणांची रूपरेषा गृहीतकृत्यांची पडताळणी, निष्कर्ष व शिफारशी यांचा समावेश करण्यात येणार आहे.

2) **प्रकरण दुसरे – भारताचा घटनात्मक विकास**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये भारतीय राज्यघटनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, राज्य घटनेचे स्त्रोत,घटना समितीचे स्वरूप व रचना,संविधान निर्मितीची प्रक्रिया,भारतीय राज्यघटनेचा उद्देश भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये,राज्यघटने संबंधीचे विविध दृष्टिकोन इत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

3) **प्रकरण तिसरे – भारतीय राज्यघटनेतील मूल्य सिद्धांत आणि व्यवहारिकता**

प्रस्तुत प्रकरणात भारतीय राज्यघटनेतील मूल्यांची सैद्धांतिक मांडणी करण्यात येणार आहे. तसेच मूल्यांचा उदय कसा झाला ? त्याची पार्श्वभूमी काय आहे ? संविधानिक मूल्यांचा अर्थ व्याख्या स्वरूप मानवी जीवनात यांचे महत्त्व या मूल्यांच्या बाबतीत विविध विचारवंतांचे मते इत्यादीचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच भारतीय घटनाकारांनी या मूल्यांच्या व्यवहारीकतेसाठी राज्यघटनेत केलेल्या तरतुदींचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष व्यवहारात या मूल्यांची स्थिती कशी आहे यांचा उहापोह करण्यात येणार आहे.

4) **प्रकरण चौथे – परभणी जिल्हा ऐतिहासिक सामाजिक व राजकीय पार्श्वभूमी**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी अभ्यासण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय परिस्थितीचा ऐतिहासिक आढावा घेऊन राज्यघटनेतील मूल्यांबद्दल नागरिकांमध्ये किती प्रमाणात जागरूकता आहे. याचे प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळणाऱ्या तत्य संकलनाच्या आधारे विश्लेषण करण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील लोकांच्या संविधाना प्रतीच्या जाणिवा सुशिक्षित व निरीक्षक लोकांची संविधाना बद्दलची मते या सर्व घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

5) **प्रकरण पाचवे – संविधानिक मूल्ये आणि संविधान साक्षरतेचा चिकित्सक अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणात भारतीय राज्यघटनेतील मूल्यांचा उद्देश पूर्ण झाला आहे काय ? संविधानातील मूल्ये सामान्य जनतेत किती प्रमाणात रुजली आहेत याची मांडणी करण्यात येणार आहे. सामान्य जनतेत मूल्य साक्षरता किती प्रमाणात आहे या प्रश्नाच्या संदर्भाने भारतीय राज्यघटनेतील मूल्यांचा चिकित्सक अभ्यास केल्यानंतर नागरिकांमध्ये संवैधानिक मूल्यांबद्दल असलेली निरक्षरता आणि त्यामुळे निर्माण झालेल्या सामाजिक,राजकीय व आर्थिक विषमता,भ्रष्टाचार,बेरोजगारी यासारख्या प्रश्नांचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संवैधानिक मूल्ये आणि मूल्य साक्षरतेचा शेतकरी,श्रमिक,अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,अल्पसंख्यांक,सुशिक्षित,निरक्षर आणि लोकप्रतिनिधी यांच्या जीवनावरील परिणाम व त्यांच्या जाणिवांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

6) **सारांश व निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये भारतीय राज्यघटनेतील मूल्य व संविधान साक्षरतेसंबंधी केलेल्या संपूर्ण अभ्यासाचा सारांश मांडण्यात येणार आहे. व संपूर्ण अभ्यासाअंती जे निष्कर्ष निघाले आहेत त्यांची मांडणी करण्यात येणार आहे.

संदर्भ ग्रंथसूची

1) डॉ.बसु दुर्गा दास ,भारत का संविधान एक परिचय, लेक्झिस नेक्झिस, गुरगाव, हरयाणा, भारत.
2) गोडबोले माधव, अनुवाद सुजाता गोडबोले, भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा, राजहंस प्रकाशन प्रा. लि.सदाशिव पेठ, पुणे.
3) जाधव तुकाराम, शिरापुरकर महेश, भारतीय राज्यघटणा व घटनात्मक प्रक्रिया खंड 1, द युनिक अकॅडमी, पुणे.
4) जाधव तुकाराम, शिरापुरकर महेश, भारतीय राज्यघटणा व घटनात्मक प्रक्रिया खंड २, द युनिक अकॅडमी, पुणे.
5) व्होरा राजेंद्र आणि पळशीकर सुहास, अनुवाद चित्रा लेले, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन, सदाशिव पेठ, पुणे.
6) डॉ.जोशी सुधाकर, भारतीय शासन आणि राजकारण, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.
7) कश्यप सुभाष सी.,अनुवाद पाटील न.ब.,आपली संसद, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया.

8) डॉ.जैन पुखराज डॉ. फडिया बी.एल.,भारतीय शासन एवं राजनिती, साहित्य भवन, आगरा,उत्तर प्रदेश.

9) गाबा ओम प्रकाश, राजनिती सिध्दांत की रूपरेखा, मयुर बुक्स, अंसारी रोड, दरीयागंज, नयी दिल्ली.

10) भोळे भा.ल. भारतीय गणराज्याचे शाषण आणि राजकारण,पिंपळपुरे बुक डीस्टीब्युटर,औरंगाबाद.

संशोधक
शिंदे नितीन लक्ष्मणराव
एम.ए.,बि.एड.,सेट राज्यशास्त्र

मार्गदर्शक
डॉ.भालेराव एस.एस.
सहायक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
राज्यशास्त्र विभाग
बी.रघुनाथ महाविद्यालय,परभणी.